# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ 1957
कोल्हापूर-४१३००४
दिनांक :-२१/०५/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेच्या गुणपत्रिका व इतर साहित्य वितरणाबाबत...**

फेब्रु.-मार्च २०२५ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका आणि तपशिलवार गुण दर्शविणारे माध्यमिक शाळांचे अभिलेख संबंधित वितरण केंद्रावर सोमवार दि.२६/०५ /२०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० पर्यंत हस्तपोहोच वितरीत करण्यात येणार आहे.

**याबाबत खालील सूचनांचे पालन करण्यात यावे.**

१) प्रथमतः आपणास प्राप्त झालेल्या सर्व गुणपत्रिका आपल्याच शाळेतील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा कराव्यात. तसेच माध्यमिक शाळेतील एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका प्राप्त न झालेस तपशीलवार माहितीसह मंडळ कार्यालयास दि.२७/०६/२०२५ अखेर लेखी कळविण्यात यावे. तदनंतर प्राप्त तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

२) सर्व गुणपत्रिकांवर मा.विभागीय सचिव यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. त्याचबरोबर गुणपत्रिकांवरील नोंदी उदा.विद्यार्थ्यांचे नाव, नावाचे स्पेलिंग व विषय इ.माहिती माध्यमिक शाळेच्या अभिलेखावरुन बिनचूक तपासण्यात याव्यात. त्यानंतरच विद्यार्थ्यास गुणपत्रिका वितरीत करण्यात यावी.

३) गुणपत्रिकांमध्ये काही त्रूटी असल्यास दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत (दि.२७/०६/२०२५अखेर) मंडळ कार्यालयात समक्ष सादर करण्यात यावेत. दुरुस्ती प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत-

अ) माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांचे शिफारस पत्र जोडणे आवश्यक आहे.

ब) गुणपत्रिकेतील प्रत्येक चूकीच्या नोंदीसाठी रु.२००/- आणि नवीन गुणपत्रिकेसाठी रु.२००/- असे एकूण रु.४००/- शुल्क भरावे लागेल.

क) माध्यमिक शाळेच्या जनरल रजिस्टरमधील संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद असलेल्या पृष्टाची मुख्याध्यापकांनी प्रमाणित केलेली छायांकीत प्रत जोडावी. तसेच प्रिलिस्ट व प्रवेशपत्रे प्राप्त झाल्यानंतर सदरची दुरुस्ती का कळविली नाही याबाबत संबंधित मुख्याध्यापक व लिपिक यांचा मा.विभागीय सचिव यांच्या नावे वस्तुनिष्ठ खुलासा सादर करावा.

४) आपल्या माध्यमिक शाळेतील गुणपत्रिका दुरुस्तीचे परिपूर्ण प्रस्ताव विहीत मुदतीत मंडळ कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. तदनंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील याची नोंद घ्यावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रति,**
सर्व वितरण केंद्र, सातारा, सांगली, कोल्हापूर,

यांना कळविण्यात येते की, मंडळ कार्यालयाकडून गुणपत्रक, SR व इतर साहित्य सोमवार दि.25/05/2025 रोजी आपल्या वितरण केंद्रावर पाठविण्यात येईल. गुणपत्रिकांचे व इतर साहित्य दि26/05/2025 रोजी शाळांना वितरित करण्यात यावे.